सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग,
महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी
दूरध्वनी : ०२२-२२६७२५३९ ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,
ई-मेल: mhsahityaacademy@gmail.com शहिद भगतसिंह मार्ग, मुंबई - ४०० ००१.

# २०२६-२७ या वर्षातील पुरस्कार योजना, पुस्तक प्रकाशन अनुदान व अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजनेसाठी प्रवेशिका मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीद्वारे २०२६-२७ या वर्षासाठी जीवन गौरव पुरस्कार, साहित्य पुरस्कार, कला पुरस्कार, नवोदित लेखक/कवी/साहित्यिक पुरस्कार, अनुवाद पुरस्कार आणि पुस्तक प्रकाशन अनुदान व अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान या योजनेसाठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

१५ वर्षांपासून महाराष्ट्रात रहिवासी असलेले लेखक वरील पुरस्कार योजना, पुस्तक प्रकाशन अनुदान आणि अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजनेसाठी प्रवेशिका सादर करू शकतात.

महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी, दुसरा मजला, जुने जकात घर, विकास विभाग इमारत, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१ येथे **दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** अर्ज/प्रवेशिका स्वीकारल्या जातील. वरील योजना, नियम, अर्ज याबद्दल अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in आणि www.mahasahitya.org या संकेतस्थळावर नवीनतम संदेश टॅबला भेट द्यावी.

अटी व शर्ती

वर्ष २०२६-२७ च्या पुरस्कारांसाठी **दि. ०१ जानेवारी, २०२३ ते दि. ३१ डिसेंबर, २०२५** या कालावधीत प्रकाशित पुस्तके स्वीकारली जातील. लेखक त्यांची एकापेक्षा जास्त पुस्तके विविध श्रेणींमध्ये पाठवू शकतात. तथापि, फक्त एकच पुस्तक पुरस्कारासाठी पात्र असेल. पुरस्कार मिळाल्यानंतर, लेखक पुढील तीन वर्षांसाठी त्या श्रेणीतील पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठवू शकणार नाहीत. डी.लिट., पीएच.डी., एम.फिल. प्रबंध, संपादित संग्रह आणि सत्कार पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. अर्ज, जीवनवृत्त, पुस्तकाच्या तीन प्रती, लेखकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो आणि महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र, आधार कार्डची छायाप्रत, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत/ कॅन्सल चेकची छायाप्रती सह अर्ज **दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत** स्वीकारले जातील. अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**टिप :- सन २०२३ व २०२४ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी ज्यांनी यापुर्वी वर्ष २०२५-२६ च्या पुरस्कारांसाठी आणि इतर योजनांसाठी माहे फेब्रुवारी - २०२६ मधील जाहीरातीनुसार अर्ज केले आहेत आणि परीक्षण बाकी आहे. त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्यांचे अर्ज वर्ष २०२६-२७ च्या पुरस्कार व इतर योजनांचे परीक्षणासाठी देखील ग्राह्य धरण्यात येतील.**

Sd/-

दि. ०१/०८/२०२६

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी

# अ) पुरस्कार योजना

या योजने अंतर्गत खालील पुरस्कार दिले जातात.

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कार संख्या | पुरस्कार रक्कम |
|---|---|---|---|
| १) | जीवन गौरव पुरस्कार | १ | रु.१,००,०००/- |
| २) | साहित्य पुरस्कार<br>चार वेगवेगळया वाङ्मय प्रकारात प्रत्येकी एक याप्रमाणे (४ X ५१,०००/-) | ४ | प्रति पुरस्कार<br>रु.५१,०००/-<br>(एकूण २,०४,०००/-) |
| ३) | कला पुरस्कार | १ | रु.५१,०००/ |
| ४) | नवोदित लेखक/कवी/साहित्यिक पुरस्कार | १ | रु.५१,०००/ |
| ५) | अनुवाद पुरस्कार | १ | रु.५१,०००/ |

पात्रता:-

१. जीवन गौरव पुरस्कार:

- संस्कृत कला, संस्कृती आणि साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जेष्ठ लेखक/साहित्यिकास हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.
- संस्कृत भाषेत महत्त्वपूर्ण साहित्यकृती निर्माण करणारे जेष्ठ लेखक/साहित्यिक या पुरस्कारासाठी पात्र आहेत.
- अर्जदाराचे संस्कृत साहित्य क्षेत्रात श्रेष्ठत्व सिद्ध असावे.
- अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. साहित्य पुरस्कार:

- **मागील ३ वर्षात (१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत)** कविता, नाटक, कादंबरी, लघुकथा, निबंध, चरित्रात्मक साहित्य, लोकसाहित्य, बालसाहित्य, समीक्षा, पत्रकारिता, वैज्ञानिक साहित्य, संस्कृत भाषा, भाषाशास्त्र आणि व्याकरण लेखन इत्यादी विविध स्वरूपात प्रकाशित झालेल्या चार वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील साहित्याची या पुरस्कारासाठी निवड केली जाईल.
- साहित्य/वाङ्.मय पुरस्कारासाठी, अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. कला पुरस्कार

- **संस्कृत भाषेतील कला, लोककला इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस दरवर्षी त्यांच्या या क्षेत्रातील योगदानाबद्दल कला पुरस्काराने गौरविण्यात येईल.**
- या पुरस्कारासाठी, अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. नवोदित लेखक / कवी/ साहित्यिक पुरस्कार

- संस्कृत भाषा व साहित्य क्षेत्रातील एका नवोदित लेखकास या पुरस्काराने गौरविण्यात येईल.
- नवोदित लेखकांना उत्कृष्ट संस्कृत साहित्य निर्माण करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार दिला जाईल.
- या पुरस्कारासाठी, अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. अनुवाद पुरस्कार

- साहित्यिक कल्पनांची देवाणघेवाण अंतर्गत मराठीमधून संस्कृत या भाषेत अनुवाद करणाऱ्या साहित्यकारांना दरवर्षी या विशेष पुरस्काराने गौरविण्यात येईल.
- गेल्या तीन वर्षांत प्रकाशित झालेल्या साहित्यकृतींची या पुरस्कारासाठी निवड केली जाईल.
- या पुरस्कारासाठी, अर्जदाराने **मूळ लेखकाचे ना हरकत** प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
- या पुरस्कारासाठी, अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण नियम:

- जीवन गौरव पुरस्कार दरवर्षी एकाच व्यक्तीला दिला जाईल.
- ज्या लेखकांना आधीच एका क्षेत्रात पुरस्कार मिळाला आहे त्यांना पुढील तीन वर्षे त्याच क्षेत्रात पुरस्कार दिला जाणार नाही. तथापि, ते दुसऱ्या क्षेत्रासाठी अर्ज करू शकतात.
- लेखक एकापेक्षा जास्त श्रेणींमध्ये अर्ज सादर करू शकतात, परंतु कोणत्याही वर्षात फक्त एकच साहित्यकृतीस पुरस्कार देण्यात येईल.
- डी.लिट., पीएच.डी. आणि एम.फिल. प्रबंध, संपादित पुस्तके पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत.
- १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली पुस्तके पुरस्कारासाठी स्वीकारली जातील.
- पुरस्कार घोषणेबाबत महाराष्ट्र शासनाचा निर्णय अंतिम राहिल.

## महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या सन २०२६-२७ या वर्षातील पुरस्कारांसाठी अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी.

विषय : ------------------------------------------------------------ पुरस्कारासाठी प्रवेशिका.

संदर्भ : अकादमी द्वारे प्रकाशित जाहिरात दिनांक ०१/०८/२०२६.

महोदय,

महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या पुरस्कार योजनेअंतर्गत, मी माझ्या प्रकाशित पुस्तकाच्या ३ प्रती यासोबत पाठवत आहे. यासंबंधीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. शीर्षक : ------------------------------------------------------------

२. साहित्य/वाङ्.मय प्रकार: ------------------------------------------------------------

३. प्रकाशन कालावधी : ------------------------------------------------------------

मी प्रमाणित करतो / करते की -
१. या पुस्तकाचा मी मूळ लेखक आहे.
२. माझ्या वरील पुस्तकात कोणताही सांप्रदायिक आशय नाही.
३. मी प्रमाणित करतो/करते की मी १५ वर्षांपासून महाराष्ट्राचा रहिवासी आहे.
४. मी हे देखील प्रमाणित करतो/करते की मला या पुस्तकासाठी इतर कोणत्याही अकादमी, राज्य किंवा केंद्र सरकारकडून कोणताही पुरस्कार मिळालेला नाही.
५. हा विद्यापीठ किंवा इतर परीक्षेसाठीचा शोधनिबंध नाही.
६. मी पुरस्कारासंबंधीचे सर्व नियम वाचले आहेत आणि मी ते मला मान्य आहेत.

स्वाक्षरी

(नाव----------------------------:   )

सोबत जोडलेले :-
१. जीवनवृत्त
२. पुस्तकाच्या तीन प्रती (३ प्रती)
३. महाराष्ट्रातील १५ वर्षांच्या कायमस्वरूपी वास्तव्य प्रमाणपत्राची छायाप्रत.
४. आधार कार्ड आणि पॅन कार्डची छायाप्रत.
५. रद्द केलेला चेक / बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत.

# जीवनवृत्त

पासपोर्ट
आकारचा
फोटो

१.  नाव : ----------------------------------------------------------------

२.  जन्म तारीख : ----------------------------------------------------------------

३.  संपूर्ण पत्ता : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

४.  ई-मेल : ----------------------------------------------------------------

५.  फोन/ मो.नं. : ----------------------------------------------------------------

६.  व्यवसाय : ----------------------------------------------------------------

७.  शैक्षणिक अर्हता : ----------------------------------------------------------------

८.  प्रकाशित साहित्य : ----------------------------------------------------------------

(यादी स्वतंत्रपणे जोडू शकता.)

९.  आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारांची माहिती: ----------------------------------------------------

(यादी स्वतंत्रपणे जोडू शकता)

१०. इतर उपलब्धी :------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

११. इतर माहिती : ------------------------------------------------------------------------

(हस्ताक्षर--------------------------)

# ब) पुस्तक प्रकाशन अनुदान योजना :

**योजनेचे उद्दिष्ट :**

संस्कृत भाषेतील उत्कृष्ट लेखनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संस्कृत लेखकांच्या **साहित्यकृती** प्रकाशित करण्यासाठी आणि या साहित्याला सर्जनशील वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**योजनेचे स्वरुप, पात्रता, नियम :**

- साहित्यिक/लेखकांनी त्यांच्या साहित्यकृतीच्या दोन हस्तलिखित/टंकलिखित प्रतींसह अर्ज अकादमी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.
- साहित्यिक/लेखकांनी त्यांच्या अर्जासोबत पुस्तक प्रकाशनाच्या खर्चाचे अंदाजपत्रक (Estimate) सोबत जोडणे आवश्यक आहे.
- लेखकाने निवडलेल्या साहित्यकृतीच्या प्रकाशनाची व्यवस्था लेखकास स्वतः करावी लागेल किंवा प्रकाशन संस्थेकडून पुस्तक छापून घ्यावे लागेल.
- पुस्तक प्रकाशन अनुदान मंजूर झाल्यानंतर, पुस्तक निर्धारित वेळेत प्रकाशित करणे आवश्यक आहे.
- साहित्यिक कृती प्रकाशित झाल्यानंतर, प्रकाशित पुस्तकाच्या २५ प्रती अकादमीला पाठविणे आवश्यक आहे.
- साहित्यिक कार्य प्रकाशित करताना, पुस्तकाच्या पहिल्या पानावर संस्कृत भाषेमध्ये खालील संदेश प्रकाशित करणे अनिवार्य आहे.

**या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या 'पुस्तक प्रकाशन अनुदान योजने अंतर्गत' प्राप्त अनुदानाच्या सहयोगाने करण्यात आले आहे.**

- एखाद्या साहित्यिकास/लेखकास त्यांच्या साहित्यकृतीला एकदा अनुदान मिळाल्यास, त्याच लेखकाला पुढील ५ वर्षे पुस्तक प्रकाशन अनुदान दिले जाणार नाही.
- अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- कोणत्याही खाजगी संस्थेद्वारे, राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या अनुदानाने प्रकाशित झालेली पुस्तके या योजनेअंतर्गत अनुदानासाठी पात्र असणार नाहीत.
- हे अनुदान फक्त मूळ पुस्तकांसाठी असेल. पूर्वी प्रकाशित झालेले किंवा पुनर्मुद्रीत पुस्तके या योजनेअंतर्गत पात्र असणार नाहीत.
- अर्जात चुकीची माहिती दिल्यास, यासाठी लेखक पूर्णपणे जबाबदार राहिल. अशा लेखकाला दिलेले अनुदान अकादमीद्वारे रद्द करण्यात येईल आणि नियमांनुसार कारवाई केली जाईल.

- या योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीबाबत अकादमीचा निर्णय अंतिम असेल. अनुदान मंजूर न झाल्यास, कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि प्राप्त हस्तलिखिते परत केले जाणार नाही.
- खालील साहित्यिक प्रकार या योजनेसाठी पात्र आहेत:
  कविता, नाटक, कादंबरी, लघुकथा, निबंध, चरित्रात्मक साहित्य, लोकसाहित्य, बालसाहित्य, समीक्षा, पत्रकारिता, अनुवाद, वैज्ञानिक आणि तांत्रिक साहित्य, भाषाशास्त्र आणि व्याकरण इ.

अनुदानाचे स्वरुप :

- या योजने अंतर्गत संस्कृत भाषेतील पुस्तकांच्या प्रकाशनासाठी प्रत्येकी कमाल २५,०००/- रुपये अनुदान देण्यात येईल.

टिप :- सन २०२३ व २०२४ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी ज्यांनी यापुर्वी वर्ष २०२५-२६ च्या पुरस्कारांसाठी आणि इतर योजनांसाठी माहे फेब्रुवारी - २०२६ मधील जाहीरातीनुसार अर्ज केले आहेत आणि परीक्षण बाकी आहे. त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्यांचे अर्ज वर्ष २०२६-२७ च्या पुरस्कार व इतर योजनांचे परीक्षणासाठी देखील ग्राह्य धरण्यात येतील.

## महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या सन २०२६-२७ या वर्षातील पुस्तक प्रकाशन अनुदान योजनेसाठी अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी.

विषय : पुस्तक प्रकाशन अनुदान प्रवेशिका.

संदर्भ : अकादमी द्वारे प्रकाशित जाहिरात दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६.

महोदय,

महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या पुस्तक प्रकाशन अनुदान योजनेअंतर्गत, मी माझ्या हस्तलिखिताच्या दोन प्रती यासोबत जोडत आहे, त्यासंबंधी तपशील खालीलप्रमाणे आहेत.

१. शीर्षक : -----------------------------------------------------

२. साहित्य/वाङ्.मय प्रकार : -----------------------------------------------------

मी प्रमाणित करतो/करते की -
१. ही साहित्यकृती मूळत: माझी आहे.
२. माझ्या वरील हस्तलिखितात कोणताही सांप्रदायिक मजकूर नाही.
३. मी प्रमाणित करतो/करते की मी १५ वर्षांपासून महाराष्ट्राचा रहिवासी आहे.
४. मी हे देखील प्रमाणित करतो/करते की मला या पांडुलिपि इतर कोणत्याही अकादमी, राज्य किंवा केंद्र
सरकारकडून कोणतेही अनुदान मिळालेले नाही.
५. हा विद्यापीठ किंवा इतर परीक्षेसाठीचा शोधनिबंध नाही.
६. मी पुस्तक प्रकाशन अनुदान संबंधीचे सर्व नियम वाचले आहेत आणि ते मला मान्य आहेत.

स्वाक्षरी

(नाव--------------------------: )

सोबत जोडलेले :-
१. जीवनवृत्त
२. हस्तलिखिताच्या दोन प्रती (२ प्रती)
३. महाराष्ट्रातील १५ वर्षांच्या कायमस्वरूपी वास्तव्य प्रमाणपत्राची छायाप्रत.
४. आधार कार्ड आणि पॅन कार्डची छायाप्रत.
५. रद्द केलेला चेक / बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत.
६. पुस्तक प्रकाशन खर्च अंदाजपत्रक (Estimate )

# जीवनवृत्त

पासपोर्ट
आकारचा
फोटो

१. नाव : ----------------------------------------------------------------

२. जन्म तारीख : ----------------------------------------------------------------

३. संपूर्ण पत्ता : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

४. ई-मेल : ----------------------------------------------------------------

५. फोन/ मो.नं. : ----------------------------------------------------------------

६. व्यवसाय : ----------------------------------------------------------------

७. शैक्षणिक अर्हता : ----------------------------------------------------------------

८. प्रकाशित साहित्य : ----------------------------------------------------------------

(यादी स्वतंत्रपणे जोडू शकता.)

९. आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारांची माहिती: ----------------------------------------------------

(यादी स्वतंत्रपणे जोडू शकता)

१०. इतर उपलब्धि :------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

११. इतर माहिती : ------------------------------------------------------------------------

(हस्ताक्षर--------------------------)

## क ) अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजना :

योजनेचे उद्दिष्ट :

या योजनेअंतर्गत मराठी व संस्कृत भाषेमध्ये साहित्यिक आदान-प्रदान होण्याच्या दृष्टीने मराठी भाषेतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा संस्कृत भाषेत अनुवाद करण्यासाठी प्रती शब्द रुपये २.००/- प्रमाणे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येईल.

योजनेचे स्वरुप, पात्रता, नियम :

- साहित्यिक/लेखकांनी त्यांच्या अनुवादीत साहित्यकृतीच्या दोन हस्तलिखित/टंकलेखित प्रती तसेच मूळ पुस्तकासह अर्ज अकादमी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.
- साहित्यिक/लेखकांनी त्यांच्या अर्जासोबत पुस्तक प्रकाशनाच्या खर्चाचे अंदाजपत्रक (Estimate) सोबत जोडणे आवश्यक आहे.
- लेखकाने निवडलेल्या साहित्यकृतीच्या प्रकाशनाची व्यवस्था लेखकास स्वतः करावी लागेल किंवा प्रकाशन संस्थेकडून पुस्तक छापून घ्यावे लागेल.
- या योजनेअंतर्गत अनुदान मंजूर झाल्यानंतर, पुस्तक निर्धारित वेळेत प्रकाशित करणे आवश्यक आहे.
- साहित्यिक कृती प्रकाशित झाल्यानंतर, प्रकाशित पुस्तकाच्या २५ प्रती अकादमीला पाठविणे आवश्यक आहे.
- साहित्यिक कृती प्रकाशित करताना, पुस्तकाच्या पहिल्या पानावर संस्कृत भाषेमध्ये खालील संदेश प्रकाशित करणे अनिवार्य आहे.

**या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या “अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजने अंतर्गत” प्राप्त अनुदानाच्या सहयोगाने करण्यात आले आहे.**

- एखाद्या साहित्यकार/लेखकास एकदा अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान मिळाल्यास, त्याच लेखकाला पुढील ५ वर्षे या याजनेअंतर्गत अनुदान दिले जाणार नाही.
- अर्जदाराने महाराष्ट्रात १५ वर्षांच्या वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- कोणत्याही खाजगी संस्थेद्वारे, राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या अनुदानाने प्रकाशित झालेली पुस्तके या योजनेअंतर्गत अनुदानासाठी पात्र राहणार नाहीत.
- अर्जात चुकीची माहिती दिल्यास, यासाठी लेखक पूर्णपणे जबाबदार राहिल. अशा लेखकाला दिलेले अनुदान अकादमीद्वारे रद्द करण्यात येईल आणि नियमांनुसार कारवाई केली जाईल.

- या योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीबाबत अकादमीचा निर्णय अंतिम असेल. अनुदान मंजूर न झाल्यास, कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि प्राप्त हस्तलिखिते परत केले जाणार नाही.
- या योजनेसाठी अर्जदाराने **मूळ लेखकाचे ना हरकत** प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

टिप :- सन २०२३ व २०२४ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी ज्यांनी यापुर्वी वर्ष २०२५-२६ च्या पुरस्कारांसाठी आणि इतर योजनांसाठी माहे फेब्रुवारी - २०२६ मधील जाहीरातीनुसार अर्ज केले आहेत आणि परीक्षण बाकी आहे. त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्यांचे अर्ज वर्ष २०२६-२७ च्या पुरस्कार व इतर योजनांचे परीक्षणासाठी देखील ग्राह्य धरण्यात येतील.

# महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या सन २०२६-२७ या वर्षातील अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजनेसाठी अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी.
विषय : अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान.
संदर्भ : अकादमी द्वारे प्रकाशित जाहिरात दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६.

महोदय,

महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमीच्या अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजनेअंतर्गत, मी माझ्या हस्तलिखित/टंकलेखित दोन प्रती यासोबत जोडत आहे, त्यासंबंधी तपशील खालीलप्रमाणे आहेत.

१. शीर्षक : ----------------------------------------------------

२. साहित्य/वाङ्.मय प्रकार : -----------------------------------------------------

३. मूळ साहित्यकृतीचे शीर्षक व लेखक : -------------------------------------------

मी प्रमाणित करतो/करते की -
१. या साहित्याचा अनुवाद मी स्वत: केलेला आहे.
२. माझ्या वरील हस्तलिखितात कोणताही सांप्रदायिक मजकूर नाही.
३. मी प्रमाणित करतो/करते की मी १५ वर्षांपासून महाराष्ट्राचा रहिवासी आहे.
४. मी हे देखील प्रमाणित करतो/करते की मला या पांडुलिपि इतर कोणत्याही अकादमी, राज्य किंवा केंद्र सरकारकडून कोणतेही अनुदान मिळालेले नाही.
५. हा विद्यापीठ किंवा इतर परीक्षेसाठीचा शोधनिबंध नाही.
६. मी अनुवादासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान योजना संबंधीचे सर्व नियम वाचले आहेत आणि ते मला मान्य आहेत.
७. मूळ लेखकाची परवानगी घेतली असून त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

स्वाक्षरी,

(नाव---------------------------: )

सोबत जोडलेले :-
१. जीवनवृत्त
२. पांडुलिपीच्या दोन प्रती (२ प्रती)
३. महाराष्ट्रातील १५ वर्षांच्या कायमस्वरूपी वास्तव्य प्रमाणपत्राची छायाप्रत.
४. आधार कार्ड आणि पॅन कार्डची छायाप्रत.
५. रद्द केलेला चेक / बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत.
६. पुस्तक प्रकाशन खर्च अंदाजपत्रक (Estimate )
७.मूळ लेखकाचे ना हरकत प्रमाणपत्र

# जीवनवृत्त

पासपोर्ट
आकारचा
फोटो

१. नाव : ------------------------------------------------------

२.जन्म तारीख : ------------------------------------------------------

३.संपूर्ण पत्ता : ------------------------------------------------------

------------------------------------------------------

४. ईमेल- : ------------------------------------------------------

५. फोन/ मो.नं. : ------------------------------------------------------

६. व्यवसाय : ------------------------------------------------------

७. शैक्षणिक अर्हता : ------------------------------------------------------

८. प्रकाशित साहित्य :------------------------------------------------------

(यादी स्वतंत्रपणे जोडू शकता.)

९. आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारांची माहिती: ---------------------------------------------

(यादी स्वतंत्रपणे जोडू शकता)

१०. इतर उपलब्धि :------------------------------------------------------

------------------------------------------------------

११. इतर माहिती : ------------------------------------------------------

(हस्ताक्षर--------------------------)